AGRI TOURISM
Pure Holidayism

WORLD AGRI TOURISM DAY
16 MAY INDIA

GLOBAL AGRITOURISM NETWORK



*ON THE OCCASION OF*

# 18TH WORLD AGRI TOURISM DAY 2025

# INTERNATIONAL CONFERENCE

A VIRTUAL CELEBRATION OF SUSTAINABLE AGRICULTURE AND RURAL TOURISM

**15TH - 16TH MAY 2025**

**VIRTUAL MODE**

## 18 व्या जागतिक कृषी पर्यटन दिनानिमित्त

# आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन परिषद

(व्हर्चुअल)

शाश्वत शेती व ग्रामीण पर्यटनाचा उत्सव

दि. 15 - 16 मे 2025

For More Updates Please Visit
**www.worldagritourismday.com**

# AGRI TOURISM CONFERENCE HISTORY

2008




2009




2013



2014



2015



2016




2017




2018




2019




2020




2021




2022



2023




2024



# AGRI TOURISM

## INTRODUCTION

Agri Tourism is a form of sound, environmentally sustainable and socially responsible tourism development which has the potential to contribute substantially to local socio-economic development and poverty reduction. Importantly and with the right support and guidance, Agri Tourism can also contribute to the conservation and protection of natural, cultural and ethnical resources. There are many good examples of successful Agri Tourism Projects in the world but many of these exist in isolation or are relatively unknown. Thus, it is important that these good projects are brought together so that the mechanisms that have led to their success and the lessons learned can be used to form a set of over-arching guidelines for Agri Tourism development in the rest of the World.

## परिचय :

आर्थिक विकास आणि दारिद्र्य निर्मूलनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देण्याची क्षमता असणारे क्षेत्र म्हणून कृषीपर्यटन या क्षेत्राला महत्त्व प्राप्त होत आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने शाश्वत आणि सामाजिक जबाबदारी ही देखील या क्षेत्राची महत्वपूर्ण वैशिष्टे मानली गेली आहेत. सर्व प्रकारचे योग्य पाठबळ आणि मार्गदर्शनाच्या मदतीने नैसर्गिक, सांस्कृतिक आणि वांशिक संसाधनांचे संवर्धन आणि संरक्षण करण्यामध्ये कृषि पर्यटन आपले योगदान देऊ शकते. जागतिक पातळीवर कृषी पर्यटन प्रकल्पांची अनेक चांगली उदाहरणे सांगितली जात असली तरी त्यातील प्रत्यक्ष तथ्य ही बरीच वेगळी आणि तुलनेने अज्ञात आहेत. कृषि पर्यटनाच्या विकासाला किवा यशाला कारणीभूत असणारे घटक, मुख्य यंत्रणा आणि त्यांचे अनुभव समजून घेऊन कृषीपर्यटन विकासासाठी अत्याधुनिक मार्गदर्शक तत्त्वांचा संच तयार करण्या करिता चांगल्या, यशस्वी आणि विकसित प्रकल्पांना एका व्यासपीठावर आणणे नक्कीच हितावाह ठरेल.










# BACKGROUND

AGRI TOURISM DEVELOPMENT CORPORATION (ATDC – Agri Tourism India) has focused on enhancement of local socio-economic development and poverty alleviation of rural and remote communities since early 2000s through Agri Tourism and community-based agritourism development. Agri Tourism projects have commenced under the ATDC's guidance. Maharashtra is the first State in India to have a formal "Agri Tourism Policy in September, 2020"

# पार्श्वभूमी :

कृषी पर्यटन विकास संस्था (ATDC – ॲग्री टुरिझम इंडिया) २००० च्या दशकाच्या सुरुवातीपासून कृषी पर्यटन आणि समुदाय-आधारित कृषी पर्यटन विकासाद्वारे स्थानिक सामाजिक - आर्थिक विकास आणि ग्रामीण आणि दुर्गम समुदायांच्या गरिबी निर्मूलनावर लक्ष केंद्रित केले आहे. ATDC च्या मार्गदर्शनाखाली कृषी पर्यटन प्रकल्प सुरू झाले आहेत. सप्टेंबर २०२० मध्ये औपचारिक "कृषि पर्यटन धोरण" अंगीकृत करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य

# 18TH WORLD AGRI TOURISM DAY 2025

## CONFERENCE THEME

**"Innovating Agritourism for a Sustainable Future : Empowering Rural Economies and Preserving Cultures"**

This theme will focus on sustainable development in agritourism, exploring the ways in which agritourism can empower rural economies, preserve local cultures, and promote sustainability in tourism.

## CONFERENCE OBJECTIVE

- Facilitate global conversations on the development and future of agritourism.
- Encourage the exchange of knowledge and best practices in sustainable agritourism.
- Showcase innovations in agritourism technology, marketing, and community engagement.
- Highlight successful agritourism models and provide actionable insights for participants.
- Provide networking opportunities for agritourism stakeholders, including farmers, entrepreneurs, policy-makers, and researchers.

# १८ वा जागतिक कृषी पर्यटन दिन 2025

## मुख्य विषय :

**ग्रामीण अर्थव्यवस्था आणि संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी कृषीपर्यटनाच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेतून शाश्वत भविष्यनिर्मिती करणे.**

या परिषदेमध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सशक्तीकरण, स्थानिक संस्कृतींचे संवर्धन, आणि पर्यटन क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यामध्ये कृषि पर्यटनाची नेमकी भूमिका मांडली जाईल.

## परिषदेची मुख्य उद्दिष्टे :

- कृषी पर्यटनाचा विकास आणि भविष्याबद्दल जागतिक विचारमंथनाला चालना देणे.
- शाश्वत कृषिपर्यटना संदर्भातील माहिती आणि प्रभावी अंमलबजावणीची तंत्रे यांची वैचारिक देवाण - घेवाण करणे.
- कृषीपर्यटनात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, विक्री व्यवस्थापन कौशल्ये, तसेच समुदायाचा सहभाग या बाबतच्या माहिती प्रदर्शित करणे.
- यशस्वी कृषिपर्यटन मॉडेल्सच्या माध्यमातून सहभागी संस्थाची या क्षेत्रातील कृतीशील विवेकदृष्टी जागृत करणे.
- कृषीपर्यटनात शेतकरी, उद्योजक, धोरणकर्ते आणि संशोधक यांना व्यावसायिक नेटवर्किंग आणि परस्पर सहयोगाच्या संधी उपलब्ध करून देणे.



## CONFERENCE OUTCOME

The information presented and results of the subsequent discussions during the conference will be collated with a view to providing input to the development of : the Global Agri Tourism Standards and Guidelines; Connect with member countries of Global Agri Tourism Network (GAN) ; and a framework to attract development partners or donor countries to concentrate and support Agri tourism development projects.

## CONFERENCE FORMAT

The conference will be organized over a period of two days and be comprised of keynote addresses from the Farmers, Agri Tourism Researchers and Academicians, Agriculture and Tourism Departments, Government of India,
Agriculture and Tourism Departments from various Nations and as well as various State Governments in India, the UNWTO and The Global Agri Tourism Network along with International Agri Tourism Organizations. This will be followed by thematic presentations on different aspects of Agri tourism and development by invited speakers. The closing sessions will be moderated panel discussions on selected topics with the view to providing the overall guidance for the formulation of the Agri Tourism standards and guidelines.

## परिषदेची उद्दिष्टे

परिषदेदरम्यान सादर केलेली माहिती आणि त्यानंतरच्या चर्चा यातून काय निष्पन्न होईल : परिषदेमधील माहितीचे सादरीकरण आणि चर्चा या माध्यमातून मिळालेल्या प्रविष्ट माहितीचा उपयोग खालील बाबींकरिता होईल.

- जागतिक कृषि पर्यटनाचे दर्जात्मक मापदंड आणि मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे.
- ग्लोबल ॲग्रीटुरिझम नेटवर्क (GAN) च्या सदस्य देशांशी संपर्क करून सह-संबंध प्रस्थापित करणे.
- कृषीपर्यटन प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय निधी मिळवण्यासाठी धोरणात्मक आराखडा तयार करणे.

## परिषदेचे स्वरूप

ही परिषद दोन दिवसांच्या कालावधीत आयोजित केली जाईल ज्यामध्ये शेतकरी, कृषीपर्यटन संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञ, कृषी आणि पर्यटन विभाग अशा विविध क्षेत्रातील महत्त्वाच्या विचारवंतांचे आणि तज्ञांचे विचार मांडले जातील.
भारत सरकार, विविध राष्ट्रांमधील कृषी आणि पर्यटन विभाग तसेच भारतातील विविध राज्य सरकार, UNWTO आणि आंतरराष्ट्रीय कृषीपर्यटन संस्थांसह ग्लोबल ॲग्रीटुरिझम नेटवर्क (GAN) यांचे महत्वपूर्ण प्रतिनिधि या परिषदेचे प्रतिनिधित्व करतील.
यानंतर निमंत्रित तज्ञ वक्त्यांकडून कृषीपर्यटन आणि त्याच्या विकासाच्या विविध पैलूंवर विषयानुरूप सादरीकरण केले जाईल.
कृषीपर्यटनासाठी व्यवसायाचे प्रमाणित मापदंड आणि मार्गदर्शक तत्वे विकसित करण्याबाबत सहभागी व्यक्ति / संस्थांना मार्गदर्शन केले जाईल.
समारोपीय सत्रांमध्ये कृषीपर्यटनातील नाविन्यपूर्ण उपक्रम, शाश्वत धोरणे आणि जागतिक कृषि पर्यटनाच्या मानांकित पद्धतीं यावर पॅनल चर्चा होईल.

The final session will be a presentation of the key points discussed and an endorsement of any key findings or points to take forward. Awards will be announced for best performing Agri tourism centers across the globe.

## CONFERENCE SPEAKERS

Agri Tourism, green growth and ecologically sustainable tourism development is multi-faceted requiring many actors playing a wide range of roles and coming from an equally diverse set of backgrounds. To address this diversity, a panel of international speakers from a variety of sectors has been assembled.

## CONFERENCE ORGANIZATION

The GLOBAL AGRITOURISM NETWORK & AGRI TOURISM DEVELOPMENT CORPORATION (Agri Tourism India) – are the Main Organizers of this important international conference

या चर्चेमध्ये कृषि पर्यटन क्षेत्रातील महत्त्वाची आव्हाने, संधी आणि धोरणात्मक उपायांवर सखोल विचारविनिमय होईल.
अंतिम सत्रात परिषदे दरम्यान झालेल्या महत्त्वाच्या चर्चांचा आढावा घेतला जाईल आणि पुढील दिशानिर्देश व कृती आराखड्यांवर भर दिला जाईल. तसेच, कृषी पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या जागतिक उत्कृष्ट संस्थाना पुरस्कार प्रदान करण्यात येतील, जेणेकरून नवीन उपक्रमांना प्रेरणा मिळेल आणि क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल.

## परिषदेमधील मान्यवर वक्ते

कृषी पर्यटन, हरित समृद्धी आणि पर्यावरणपूरक शाश्वत विकासहासमग्र आणि बहुआयामी दृष्टिकोन असलेला विषय आहे. या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पार्श्वभूमीतील तज्ज्ञ आणि समविचारी प्रतिनिधी महत्त्वाची भूमिका बजावतात. या व्यापक संकल्पनेला समजून घेण्यासाठी आणि उपयुक्त मार्गदर्शनासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित तज्ञांचे पॅनेल या परिषदेकरिता एकत्र आणले आहे.

## परिषदेचे आयोजन

ही महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय परिषद ग्लोबल ॲग्रोटुरिझम नेटवर्कआणि ॲग्रोटुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एजीआरआय टूरिझम इंडिया)यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.





# Agenda Overview (Day 1 and Day 2)

---

## Day 1 : Global Perspectives, Policy Discussions, and Innovations

---

### 1. Opening Ceremony (30 mins)

- **Welcome Remarks (5 mins) :** The host or moderator introduces the conference and its objectives.
- **Inaugural Speech (10 mins) :** Delivered by an industry leader or a notable personality in agritourism, addressing the importance of agritourism in sustainable tourism development.
- **Keynote Speech (15 mins) :** An internationally recognized agritourism expert delivers a keynote on the evolving landscape of agritourism and how it fosters sustainability, cultural preservation, and rural empowerment.

### 2. Panel Discussion 1 : "Agritourism and Sustainable Rural Development" (60 mins)

Experts from diverse backgrounds, including agritourism practitioners, government representatives, sustainability experts, and rural development advocates, discuss

# कार्यक्रमाचे स्वरूप (दिवस - १ ला आणि २ रा)

---

## दिवस पहिला : कृषिपर्यटनातील जागतिक दृष्टीकोन, धोरणात्मक संवाद आणि सर्जनशीलता

---

### १. उद्घाटन समारंभ (३० मिनिटे)

- **सहभागी संस्थांचे स्वागत (५ मनिटे)** यामध्ये संयोजक परिषदेची माहिती देऊन उद्दिष्टे स्पष्ट करतील
- **उद्घाटनपर भाषण ( १० मिनिटे)** शाश्वतपर्यटन विकासामध्ये कृषीपर्यटनाचे महत्त्व या विषयावर कृषिपर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञ आणि उल्लेखनीय मान्यवरांचे विचारमंथन.
- **बीजभाषण (१५मिनिटे)** कृषीपर्यटन क्षेत्राचे नवीन नदृष्टिकोन, शाश्वत विकासामध्ये त्याचे योगदान, सांस्कृतिक संवर्धन, आणि ग्रामीण सक्षमीकरण या विषयावर आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल.

### २. चर्चासत्र - कृषि पर्यटन आणि शाश्वत ग्रामीण विकास - (६० मिनिटे)

चर्चासत्रा मध्ये कृषीपर्यटन व्यावसायिक, शासकीय प्रतिनिधी, शाश्वत विकासाचे मार्गदर्शक आणि ग्रामीण विकासाचे अभ्यासक यांचा सहभाग असेल. ज्यामध्ये ग्रामीण विकासाला चालना देण्यामध्ये कृषि पर्यटनाची भूमिका आणि महत्त्व विशद केले जाईल तसेच ग्रामीण समुदायाचे सक्षमीकरण या विषयावर मान्यवर चर्चा करतील.

how agritourism can drive rural economic development and empower local communities.

### Key Topics to be Discussed :

- How agritourism can support rural economies.
- Policy frameworks for promoting sustainable agritourism.
- Creating synergies between tourism and agriculture for rural development.
- Case studies from across the global agritourism destinations.

## 3. Virtual Farm Tours (45 mins)

Pre-recorded virtual farm tours from different countries showcasing various types of agritourism models. Each tour will focus on unique aspects such as :

- Sustainable farming techniques.
- Agritourism-based cultural experiences.
- Organic farming, eco-tourism, and farm-to-table dining experiences

The tours will provide an immersive experience, with on-the-ground narratives from farmers and local community members.

## 4. Networking Break (30 mins)

Participants will be invited to join virtual breakout rooms based on their region, sector, or area of interest. This session will facilitate informal networking and discussion between agritourism stakeholders, including farmers, entrepreneurs, and policy-makers.

### चर्चासत्राचे मुख्य मुद्दे :

- कृषि पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला कशी मदत होऊ शकते?
- शाश्वत कृषीपर्यटनाला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणात्मक बाबी कोणत्या आहेत?
- ग्रामीण विकासामध्ये पर्यटन आणि शेती यांचा समन्वय कसा साधता येईल?
- ग्रामीण विकासासाठी पर्यटन आणि कृषी यांच्यात समन्वय निर्माण करणे.
- जागतिक पातळीवर यशस्वी झालेल्या कृषि पर्यटन केंद्रांचे केस स्टडीज.

## ३. डिजिटल शिवारफेरी ( ४५ मिनिटे)

या मध्ये विविध देशांमधील कृषि पर्यटनाचे मॉडेल दाखवणाऱ्या चित्रफिती सादर केल्या जातील. ज्यामध्ये मुख्यत्वेकरून खालील विषयाचे विश्लेषण केले जाईल.

- तंत्रशुद्ध शाश्वत शेती.
- पर्यटनावर आधारित सांस्कृतिक अनुभव.
- सेंद्रियशेती, पर्यावरणपूरक पर्यटनपद्धती, आणि शेतातील ताज्या अन्नपदार्थांचा थेट ताटापर्यंत प्रवास म्हणजेच “फार्म-टू-टेबल“या संकल्पनेचा प्रत्यक्ष अनुभव.

या डिजिटल शिवारफेरीद्वारे सहभागींना स्थानिक शेतकरी आणि कृषि पर्यटनामध्ये विविध पातळीवर काम करणारे कर्मचारी, पर्यटक यांचे प्रत्यक्ष अनुभव ऐकण्याची आणि पाहण्याची संधी मिळेल.

## ४. नेटवर्किंग ब्रेक ( ३० मिनिटे)

या सत्रामध्ये डिजिटल ब्रेकआउटरूमची व्यवस्था करण्यात आली असून या मध्ये सहभागी संस्था प्रतिनिधींना त्यांच्या विषयाच्या संबंधीत क्षेत्र तसेच आवडी-निवडी यानुसार डिजिटल ब्रेकआउटरूममध्ये निमंत्रित केले जाईल. या सत्राद्वारे कृषीपर्यटन संबंधित घटकांची, जसे शेतकरी, उद्योगधंद्यांचे मालक आणि धोरणकर्ते यांची अनौपचारिक चर्चा आणि नेटवर्किंग वाढवण्याची संधी मिळेल.

## 5. Breakout Sessions (60 mins)

Interactive breakout rooms with a range of topics for participants to choose from:

- **Breakout Room 1 :**
  "Starting and Scaling an Agritourism Business: A Practical Guide."
- **Breakout Room 2 :**
  "How to Promote Agritourism Through Digital Marketing."
- **Breakout Room 3**
  "Sustainability in Agritourism: Best Practices and Innovations."
- **Breakout Room 4 :**
  "The Role of Agritourism in Cultural Preservation and Rural Empowerment."

## 6. Workshop 1 : "Innovative Technologies in Agritourism" (45 mins)

This workshop will explore how agritourism operators can integrate technology into their business models.

**Key Learning Points :**

- Using virtual reality (VR) and augmented reality (AR) in agritourism.
- Technology for enhancing customer experience and operational efficiency.
- Digital booking systems, social media, and mobile apps for promotion.

## 7. Day 1 Closing Remarks (15 mins)

A summary of the key insights and discussions from Day 1, along with an overview of what to expect on Day 2.

## ५. ब्रेकआउटसत्रे (६०मिनिटे)

सहभागींसाठी विविध विषयांवर आधारित संवादात्मक ब्रेकआउट रूम : सहभागी आपल्या गरजेनुसार अथवा आवडी नुसार रूमची निवड करू शकतात.

- **ब्रेकआउट रूम १ :** कृषीपर्यटन व्यवसायाची सुरुवात आणि विस्तार: एक व्यवहार्य मार्गदर्शन
- **ब्रेकआउट रूम २ :** डिजिटल मार्केटिंगद्वारे कृषीपर्यटना चा प्रचार आणि प्रसार कसा करावा?
- **ब्रेकआउट रूम ३ :** शाश्वत आणि समावेशक कृषीपर्यटन- सर्वोत्तम पद्धती आणि सर्जनशीलता
- **ब्रेकआउट रूम ४ :** ग्रामीण संस्कृती संवर्धन आणि सक्षमीकरणामध्ये कृषीपर्यटनाची भूमिका

## ६. कार्यशाळा १ : "कृषीपर्यटनातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान" (४५मिनिटे)

सदर कार्यशाळेमध्ये कृषिपर्यटन व्यवसायामध्ये तंत्रज्ञानाचा समावेश कसा करता येईल याबाबतचे सविस्तर विवरण मांडले जाईल.

**महत्त्वाचे मुद्दे :**

- कृषिपर्यटन व्यवसायाला डिजिटल स्वरूप देण्याच्या दृष्टीने व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) आणि ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) म्हणजेच आभासी आणि अद्ययावत वास्तव स्वरूप कसे देता येईल या बाबत माहितीपूर्ण सत्र.
- तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्राहकांना अधिकाधिक उत्तम अनुभव देणे आणि व्यवसाय प्रक्रिया अधिक सुलभ करणे कसे शक्य आहे याबाबत मार्गदर्शन.
- डिजिटल बुकिंग प्रणाली, सोशल मीडिया, आणि मोबाइल ॲप्सद्वारे व्यवसाय प्रचार कसा करावा.

## ७. पाहिल्या दिवसाचा सारांश आणि समारोप (१५ मिनिटे)

पहिल्या दिवसातील सर्व सत्रांचा आढावा, अनौपचारिक चर्चा आणि दुसऱ्या दिवसाची रूपरेषा

## Day 2 : Agritourism Innovations, Cultural Exhibitions, and Networking

### 1. Day 2 Kick-off and Recap of Day 1 (15 mins)

The host/moderator provides a brief summary of Day 1, reviewing the main takeaways and setting the stage for the second day of the conference.

### 2. Panel Discussion 2 : "Technology and Innovation in Agritourism" (60 mins)

Panelists from technology companies, agritourism entrepreneurs, and innovators discuss how technology is shaping the future of agritourism and improving operational efficiency, marketing, and customer engagement.

#### Key Topics to be Discussed :

- Role of digital platforms in promoting agritourism globally.
- Innovations in farm tours (virtual/augmented reality).
- Technology for managing agritourism operations and visitor experiences.

## दिवस दुसरा : कृषीपर्यटनातील नाविन्यपूर्ण संकल्पना, सांस्कृतिक सादरीकरण आणि व्यावसायिक नेटवर्किंग

### १. आढावा (१५ मिनिटे)

संयोजक पहिल्या दिवसाच्या महत्त्वपूर्ण निष्कर्षांचा संक्षिप्त आढावा सादर करतील आणि दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडतील.

### २. चर्चासत्र : कृषिपर्यटनातील तंत्रज्ञान आणि सर्जनशील विचारधारा (६० मिनिटे)

चर्चासत्रामध्ये तंत्रज्ञान कंपन्यांमधील पॅनेलिस्ट, कृषीपर्यटन व्यावसायिक तसेच रचनात्मक मांडणी करणारे अभ्यासक यांचा समावेश केला असून चर्चेच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या मदतीने कृषिपर्यटन व्यवसायाची कार्यक्षमता कशी वाढवता येईल, मार्केटिंग आणि संतुष्ट ग्राहक संकल्पना कशी राबवावी या मुद्द्यावर प्रकाश टाकला जाईल.

#### मुख्य मुद्दे :

- कृषिपर्यटनाचा जागतिक प्रसार करण्यामध्ये डिजिटल माध्यमांची भूमिका
- व्हर्च्युअल / ऑगमेंटेड शिवारफेरी कशी विकसित करावी
- कृषीपर्यटन व्यावसायाची कार्यप्रणाली आणि ग्राहकनुभव यासाठीचे तांत्रिक व्यवस्थापन.

## 3. Workshop 2 : "Collaborating for Success : Building Networks in Agritourism" (45 mins)

This workshop will focus on building partnerships and networks for growing agritourism businesses.

**Learning Outcomes :**

- How to form collaborations with local governments, tourism boards, and international organizations.
- Strategic partnerships with travel agencies and hospitality sectors.
- Promoting regional and cross-border agritourism initiatives.

## 4. Cultural Exhibitions and Performances (30 mins)

Participants will be treated to cultural exhibitions showcasing music, dance, and traditions from different regions. This segment will emphasize how agritourism plays a key role in preserving and promoting local cultures.

## 5. Virtual Exhibition Hall & Marketplace (90 mins)

Participants will be able to visit virtual booths set up by agritourism operators, entrepreneurs, and service providers.

- **Virtual Booths** : Agritourism destinations can showcase their unique farm experiences, sustainable practices, and tourism packages.
- **Marketplace** : Local producers can sell farm products such as organic produce, traditional handicrafts, and artisanal goods.
- **Live Q & A** : Exhibitors can interact with participants in real-time through chat or video.

## ३. कार्यशाळा-२ : कृषीपर्यटन व्यवसायासाठी सामूहिक सहकार्य : नेटवर्क्सची निर्मिती कशी करावी (४५ मिनिटे)

कृषीपर्यटन व्यावसायाचा विस्तार करण्यासाठी परस्पर सहकार्य आणि नेटवर्किंगची निर्मिती करण्याची आवश्यकता या विषयावर मार्गदर्शन केले जाईल.

**महत्त्वाचे मुद्दे :**

- स्थानिक प्रशासन, पर्यटन मंडळे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कृषीपर्यटनासाठी भागीदारी निर्माण करणे आणि सहकार्य प्रस्थापित करणे या बाबत विचारमंथन
- ट्रॅव्हल एजन्सी आणि आतिथ्य म्हणजेच हॉस्पिटॅलिटी यांच्याबरोबर भागीदारी करण्याचे फायदे.
- प्रादेशिक स्तरावर कृषीपर्यटनाचा प्रचार कसा करावा.

## ४. कला आणि सांस्कृतिक सादरी करणे (३०मिनिटे)

या सत्रामध्ये सहभागींना, विविध प्रांतांमधील संगीत, नृत्य, आणि पारंपारिक कला सादर करणारी संस्कृती अनुभवायला मिळेल ज्यामध्ये कृषीपर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक संस्कृतीचे संवर्धन आणि प्रसार कसा करावा यावर भर दिला जाईल.

## ५. व्हर्च्युअल प्रदर्शन हॉल आणि मार्केट प्लेस (९०मिनिटे)

कृषि पर्यटन व्यावसायिक, उद्योजक,आणि सेवा पुरवठादार यांनी तयार केलेले व्हर्च्युअल स्टॉल्सला भेट देण्याची संधी मिळेल.

- **व्हर्च्युअल स्टॉल्स :** पर्यटन स्थळांच्या माध्यमातून शेतीचा अनुभव,शाश्वत विकासाच्या पद्धती तसेच पर्यटन पॅकेजेस इ.प्रदर्शित करू शकतात.
- **मार्केट प्लेस :** स्थानिक उत्पादक शेतातील उत्पादने जसेकी सेंद्रिय उत्पादने, पारंपारिक हस्तकला, आणि हस्त निर्मित वस्तू तथा वस्त्र विकू शकतात.
- **लाइव्ह प्रश्नोत्तर सत्र :** प्रदर्शक सहभागींसोबत चॅट किंवा व्हिडिओद्वारे प्रत्यक्ष संवाद साधू शकतात.

## 6. Breakout Sessions (60 mins)

Simultaneous breakout discussions to encourage participant engagement on key areas of interest :

- **Breakout Room 1** : "Developing Agritourism for Small and Family-Owned Farms."
- **Breakout Room 2** : "Sustainable Agritourism Business Models."
- **Breakout Room 3** : "Policy and Regulation in Global Agritourism : Challenges and Solutions."

## 7. Awards & Recognition Ceremony (60 mins)

A celebratory ceremony to honor outstanding contributors in the agritourism industry. Categories may include :

- Best Agritourism Initiative.
- Most Innovative Agritourism Business Model.
- Best Use of Technology in Agritourism.
- Outstanding Cultural Preservation through Agritourism.

## 8. Closing Remarks & Call to Action (30 mins)

- A concluding keynote address focusing on the future of agritourism and the potential for growth in the global economy.
- **Call to Action** : The moderator/ host provides closing remarks, encouraging attendees to apply insights gained from the conference to their own agritourism ventures and to continue fostering international collaboration in the sector.

## ६. ब्रेकआउट सत्र (६०मिनिटे)

या सत्रामध्ये सहभागी प्रतिनिधींमध्ये खाली नमूद केलेल्या विषयांबाबत विचारांना चालना देणारी चर्चा घडवून आणली जाईल.

- **ब्रेकआउट रूम १ :** लहान किंवा कौटुंबिक शेतीमध्ये कृषिपर्यटन व्यवसाय कसा विकसित करावा.
- **ब्रेकआउट रूम २ :** कृषिपर्यटन व्यवसायाचे शाश्वत किंवा दीर्घकालीन मॉडेल कसे असावे.
- **ब्रेकआउट रूम ३ :** जागतिक कृषीपर्यटनामध्ये धोरणात्मक आणि नियमात्मक दृष्टीकोन आव्हाने आणि उपाय.

## ७. पुरस्कार आणि सन्मान समारंभ (६०मिनिटे)

कृषी पर्यटन क्षेत्रामध्येउत्कृष्ट योगदान देणाऱ्या उद्योजक/ व्यावसायिक तसेच संस्थांचा सन्मान समारंभ आयोजित केला जाईल.हा सन्मान खालील श्रेणींमध्ये दिला जाईल.

- सर्वोत्तम कृषीपर्यटन उपक्रम.
- सर्वोत्तम नाविन्यपूर्ण कृषीपर्यटन व्यवसाय मॉडेल.
- कृषीपर्यटनात तंत्रज्ञानाचा सर्वोत्तम वापर.
- कृषीपर्यटनाद्वारे उत्कृष्ट सांस्कृतिक संवर्धन.

## ८. समारोप आणि कृतीशील नियोजन (३० मिनिटे)

- कृषीपर्यटनातील आगामी विकास आणि जागतिक बाजारपेठ विस्तार या महत्वपूर्ण विषयावर समारोपाचे भाषण होईल.
- दोन दिवसांच्या परिषदेतून मिळालेले ज्ञान आणि माहितीच्या आधारे सहभागी प्रतिनिधींनी त्यांच्या स्वत:च्या कृषी पर्यटन व्यवसायाचा विकास करणे तसेच आवश्यक बाबींचा त्यांच्या उपक्रमांमध्ये समावेश करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये देखील आपले योगदान कसे देता येईल या दिशेने कार्यरत होणे आवश्यक आहे. त्यानुसार सहभागींनी पुढील कृतीआराखडा तयार करावा असे आवाहन संयोजक करतील.